म.सं.कौ.हि.का.अर्ज क्र. १९/२०२४
(CNR : MHNS200008492024)
ज्योत्स्ना वि. दामु व इतर

## निशाणी क्र. ०५ खालील आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला क्र. ०१ याचेकडून अंतरीम अन्नवस्त्राची रक्कम दरमहा रू. ७,०००/-(रूपये सात हजार फक्त) मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार हीने सामनेवाले क्र. १ ते १० विरूद्ध प्रस्तुतचे प्रकरण दाखल केले असुन आजरोजी ती तिच्या आईवडीलांकडे रहात असुन तिचा उदरनिर्वाह व औषधोपचारासाठी ती त्यांच्यावरच अवलंबुन आहे. प्रकरणात सुनावणी होवून न्यायनिर्णय होण्यास बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानचे काळात दैनंदीन गरजा भागविण्यासाठी व न्यायालयीन कामकाजासाठी अर्जदारास पैशांची आवश्यकता आहे. सामनेवाला क्र. १ हा कंपनीत नोकरीस असुन त्यास दरमहा रू. ३० हजार इतका पगार मिळतो. अर्जदारास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. सामनेवाला क्र. १ हा अंतरीम अन्नवस्त्राची रक्कम अर्जदाराला देण्यास पात्र आहे. सबब, अर्ज मंजुर करण्यास विनंती करण्यात आली आहे. अर्जाच्या पृष्टयर्थ अर्जदार हिने निशाणी क्र. ०७ वर आपले प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

३. सामनेवालांतर्फे निशाणी क्र. १० अन्वये मूळ अर्जास जबाब दाखल केला आहे. निशाणी क्र. १५ अन्वये सामनेवाला क्र. १ याने पुरसीस दाखल करून मुळ अर्जाचा जबाब हाच अंतरिम अर्जाचा जबाब म्हणून वाचण्यात येण्यासाठी विनंती केली आहे. निशाणी क्र. १० वरील म्हणण्यामध्ये सामनेवाला क्र. १ याने अर्जदारासोबत विवाह झाल्याची बाब मान्य केली आहे. त्याचे पुढे कथन असे आहे की, अर्जदार नांदायला आल्यानंतर ती सामनेवाले यांना घर बारीक असल्यावरून नेहमी बोलत असे. तसेच, रात्रीच्या वेळी अंगात येण्याचे नाटक करून अर्जदाराला घरात घाबरवत असे व त्याला धमकावून त्याचेकडचे पैसे बळजबरीने काढून घेत असे. अर्जदाराचे वडील देखील उसने पैसे मागुन ते न दिल्यास मुलीला नांदायला पाठवणार नाही व फारकत घेवून टाकील अशी धमकी देत असत.

४. सामनेवाला क्र. १ तर्फे पुढे असे कथन आहे की, अर्जदार ही शरीराने नाजुक असल्याने सामनेवाला क्र. १ ची आई ही अर्जदाराला सुकामेवा व नारळपाणी आणून जबरदस्तीने खायला लावत असे. अर्जदाराला मुलबाळ होत नसल्यामुळे डोंबिवली व नाशिक येथील वेगवेगळया दवाखान्यात ६ वर्षे तिच्यावर औषधोपचार केले असुन त्याचा सर्व खर्च सामनेवाले यांनीच केला आहे. सामनेवाला क्र. १ हा अर्जदारास अंबरनाथ येथील प्रसिद्ध शिवमंदीर, चांदवड येथील केंद्राई देवी मंदीर, माथेरान, गोवा, कोकण व हिमाचल प्रदेशातील ज्वालामाता मंदीर येथे फिरायला नेवून देवदर्शन करून पुर्ण हौसमौस केली आहे. तसेच, दरवर्षी तिचा वाढदिवस देखील साजरा केला आहे. सामनेवाले यांनी अर्जदारास केलेले मंगळसुत्र तिला पसंत पडले नसल्यामुळे तिच्या आग्रहास्तव दिड सोन्याचे पट्टीचे मंगळसुत्र सामनेवाला याने केले आहे. तसेच, माहेरी जातेवेळी ती तिचे स्त्रिधन माहेरी घेवून गेली आहे. सामनेवाला क्र. १ हा अर्जदार हिला आजही नांदवायला तयार असल्याचे पुढे म्हणणे मांडण्यात आले आहे.

५. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पाहीले.

६. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मुदद् माझया विवेचनाकरीता उपस्थित होतात, त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवीत आहे :-

| अ.क्र. | मुदद् | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १ | अर्जदारास सकृतदर्शनी केस आहे काय ? | ....अंशत: होय. |
| २ | अर्जदाराने सकृतदर्शनी सिध्द् केले आहे काय की, सामनेवाला क्र. ०१ ने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाकडे पुर्णपणे दुर्लक्षित केले आहे अथवा तिला सांभाळण्यास त्याने पुर्णपणे नकार दिला आहे? | ....अंशत: होय. |
| ३ | अर्जदाराने सकृतदर्शनी सिध्द् केले आहे काय की, तिची उपजिवीका करण्याची असमर्थता असून सामनेवाला क्र. ०१ याची तिची उदरनिर्वाह करण्याची पुरेपूर क्षमता आहे? | ....अंशत: होय. |
| ४ | अर्जदार ही सामनेवाला क्र. ०१ याचेकडून अंतरिम पोटगीचा आदेश मिळणेस पात्र आहे काय? असल्यास कोणत्या दराने व केव्हापासून? | ...अंशत: होय, अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ५ | आदेश काय ? | .....अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुददे क्र. ०१ ते ०४ करीता</u>** :-

७. सदर मुददे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांचे विवेचन एकत्रितपणे करण्यात येत आहे. अर्जदाराने निशाणी क्र. ०३ सोबत शिवाजीनगर, ठाणे पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीची छायांकित प्रत, अर्जदाराचे दिनांक १६.०३.२०२४ रोजीचे वैद्यकीय प्रमाणपत्र व अर्जदाराची लग्नपत्रिका यांची पडताळीत प्रत दाखल केली आहे. सामनेवाला क्र. ०१ तर्फे निशाणी क्र. १८ सोबत एच.आर. सपोर्ट सर्व्हिसेस यांनी पाठविलेल्या पत्राचे पाकीट, सामनेवाला क्र. ०१ यास नोकरीवरून काढून टाकल्याचे पत्र व दिवाणी न्यायालय, वरीष्ठ स्तर, सिन्नर यांचेकडील विवाह अर्ज क्र. ७८/२०२४ मधील समन्सची प्रत दाखल केली आहे. अर्जदाराने निशणी क्र. १३ वर व सामनेवाला क्र. १ ने निशाणी १६ वर त्यांचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र सादर केले आहे.

८. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व अभिलेखावर आलेली कागदपत्रे पाहिली असता, अर्जदार व सामनेवाला क्र. ०१ यांचा विवाह झाल्याची, सदर विवाह संबंध कायम असल्याची बाब वादातीत नाही. मुळ अर्जामध्ये अर्जदाराने दिनांक १६ मार्च २०२३ रोजी तिला सामनेवाला यांनी आईवडीलांकडून पैसे घेवून येण्यासाठी तिचा मानसिक व शारीरीक छळ करून माहेरी जाण्यास भाग पाडले व तेंव्हापासुन ती तिच्या माहेरी रहात असल्याचे कथन मांडले आहे. सामनेवाला क्र. ०१ ने अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहत असल्याचे देखील नाकारलेले नाही. अर्जदाराने मळ अर्जात सामनेवाला क्र. १ ते १० यांनी तिचा शारिरीक व मानसिक छळ केल्याचे मुळ अर्जात कथन मांडले असून सामनेवाला क्र. ०१ ने ते नाकारले आहेत. अर्जदार ही कोणत्या कारणावरून माहेरी राहत आहे, ही बाब उभय पक्षकारांकडून सादर होणा-या मौखिक व लेखी पुराव्यावरून गुणवत्तेवर तपासून पहावी लागणार आहे. तथापि, अर्जदार ही सामनेवाला क्र. ०१ ची कायदेशिर पत्नी असल्याचे दिसून आल्याने 'पती' म्हणून त्याने तिला सांभाळण्याची त्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी आहे.

९. निशाणी क्र. १३ वरील शपथपत्रात अर्जदार हिने सध्याचा धंदा/व्यवसाय काहीही नसल्याचे नमूद केले आहे. अर्जदार ही आजमितीस स्वत

:चा चरितार्थ सांभाळण्यास समर्थ असल्याबाबत सकृतदर्शनी ठोस पुरावा न आल्याने ती त्यास असमर्थ आहे, असेच सध्या सकृतदर्शनी अनुमान काढावे लागेल.

**१०.** अर्जदाराच्या कथनांनुसार, सामनेवाला क्र. ०१ यास नोकरीतुन दरमहाा रक्कम रू. ३० हजार पगार मिळतो, परंतु सामनेवाला क्र. १ तर्फे दाखल कागदपत्रांवरून एच.आर. सपोर्ट सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडून त्याची रोजगार समाप्ती केल्याचे पत्र अभिलेखावर आले आहे. निशाणी क्र. १६ वरील मालमत्ता व दायित्वाच्या शपथपत्रात सध्याचा धंदा/व्यवसाय निरंक असुन सध्याचे मासिक उत्पन्न रू. ०/- दर्शविले आहे. परंतु, तो कामधंदा करण्यास असमर्थ असल्याचे सामनेवाला यांचे म्हणणे नाही. त्याचे सध्याचे वय व प्रकृती लक्षात घेता, तो सामान्य परिस्थितीमध्ये स्वत:चे उत्पन्न कमाविण्यास सक्षम आहे, असे अनुमान सदयस्थितीत काढता येईल. सामनेवाला क्र. १ याचेवर इतर त्याचे कुटुंबातील व्यक्ती अवलंबुन असल्याचे त्याने अभिलेखावर म्हणणे मांडले नाही.

**११.** अर्जदार ही तिच्या माहेरी रहात असल्यापासून सामनेवाला क्र. ०१ ने त्यांच्या उपजिवीकेसाठी काय सोय केली, हे त्याच्या म्हणण्यात स्पष्ट केले नाही. अर्जदाराने उदरनिर्वाहासाठी अर्ज दाखल करेपर्यंत सामनेवाला क्र. ०१ ने तिला कोणत्या सुविधा पुरविल्या, हे अभिलेखावर सकृतदर्शनी आले नसल्याने एक 'पती' म्हणून त्याने कायदेशिर व नैतिक दायित्व निभावले नाही, असेच सकृतदर्शनी दिसून येते. शिवाय, अर्जदार हिस उत्पन्नाचे साधन असलेबाबत सकृतदर्शनी पुरावा सामनेवाला क्र. ०१ याने सादर केला नाही. त्यामुळे दैनंदिन आयुष्य जगण्यासाठी अर्जदारास अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल.

**१२.** अर्जदाराच्या मुलभूत गरजा, सदयस्थितीतील महागाई, अर्जदाराचे आरोग्य, सामनेवाला क्र. ०१ याचे उत्पन्नाचे साधनाबाबतचे अनुमान, त्याचेवर अवलंबून असणा-या कुटूंबियांची संख्या आणि उभय पक्षांचा असलेला राहणीमानाचा दर्जा इत्यादी बाबी प्रथमदर्शनी पाहिल्या असता, अर्जदारास मुळ अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत अंतरिम पोटगी म्हणून दरमहा प्रत्येकी रक्कम रू. ३,०००/ - (रूपये तीन हजार फक्त) या दराने सामनेवाला क्र. ०१

कडून मिळणेचा आदेश करणे न्यायोचित होईल. सबब, मुदद्‍ा क्र. ०१ ते ०४ चे निष्कर्ष मी त्याप्रमाणे नोंदविले आहे.

**<u>मुदद्‍ा क्र. ०५ करीता</u>** :-

**१३.** उपरोक्त मुददे क्र. ०१ ते ०४ करता केलेल्या विवेचनाच्या अनुषंगाने प्रस्तुतचा अर्ज हा अंशतः मंजूर होणे क्रमप्राप्त आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे :-

**-: <u>आदेश</u> :-**

१ अर्ज अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२ सामनेवाला क्र. ०१ ने अर्ज दाखल तारखेपासून अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत अर्जदार हीला प्रत्येकी दरमहा रक्कम रू. ३,०००/- (रूपये तीन हजार फक्त) या दराने अंतरिम पोटगी दयावी.

३ प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यास विनामूल्य देण्यात यावी.

सही/-

**( आर. आर. कुलकर्णी )**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

सिन्नर न्यायालय, सिन्नर

ठिकाण :- सिन्नर.

दिनांक :-०५/११/२०२४.